# जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, धुळे

## N.A.S./S.L.A.S. आधारित सराव प्रश्नसंच सन 2023-24.

**इयत्ता ५ वी** **दिनांक : / ०३/२०२४**

---

**प्रश्न पुढील कविता वाचून प्रश्न क्र. 1 ते 4 ची उत्तरे लिहा.**

माऊला सापडली घुंगरांची माळ
ते झाले तिच्या पायातले चाळ
छम्मक छम्मक ऐटीत चालली
ता थै तक थै नाचू लागली
नाचून नाचून दमली खूप
सपाटून तिला लागली भूक
चोरून ती दूध प्यायला गेली
घुंगरांचा आवाज ऐकून आई उठली
मग ती गेली उंदीर शोधायला
आवाजाने तेही लागले पळायला
वैतागून तिने आता चाळ दिले फेकून
लक्ष ठेवा हं दुधावर, ती हळूच जाईल पिऊन

**1. माऊला काय सापडली ?**

(1) मण्यांची माळ (2) फुलांची माळ (3) मोत्यांची माळ (4) घुंगरांची माळ

**2. माऊला दूध का पिता आले नाही ?**

(1) दूध गरम होते म्हणून (2) दूधाचे पातेले वरती होते म्हणून

(3) घुंगरांचा आवाज ऐकून आई उठली म्हणून (4) वरीलपैकी सर्व

**3. माऊ कशामुळे वैतागली ?**

(1) घुंगरांच्या आवाजामुळे दूध मिळाले नाही म्हणून (2) उंदीर पळाला म्हणून

(3) घुंगरामुळे उपाशी राहिली म्हणून (4) वरील सर्व पर्याय बरोबर

**4. माऊने वैतागून काय फेकून दिले ?**

(1) माळ (2) चाळ (3) उंदीर (4) दूध

**प्रश्न पुढील उतारा वाचून प्रश्न क्र. 5 ते 7 ची उत्तरे लिहा.**

''पाऊस पडेल'' या आशेने शेतकरी पेरणी करतात. त्याला धूळपेरणी म्हणतात. पाऊस लवकरच पडेल. अशी त्यांना आशा असते. पाऊस उशिरा पडला किंवा फारच कमी पडला, तर पेरलेले बी वाया जाते. दुबार पेरणी करावी लागते. हा खर्च शेतकऱ्यांना परवडत नाही. उगवलेले पीक वाया जाते आणि शेतकरी अडचणीत सापडतात. शेतात पीक पिकले तरी पिकांवर अनेक वेळा रोग पडतो, कडाक्याची थंडी पडून देखील पीक वाया जाते.

धान्य पिकवण्यामागे शेतकऱ्यांना किती कष्ट करावे लागतात ते आपल्याला माहीत आहे. ऊन, पाऊस, कडक थंडी, दिवस, रात्र शेतकरी शेतात कष्ट करत असतात.

**5. हा उतारा कोणत्या ऋतुचा आहे?**

(1) उन्हाळा (2) पावसाळा (3) हिवाळा (4) शिशिर

**6. उतारा कोणाशी संबंधित आहे?**

(1) शेतकरी (2) पाऊस (3) पीक (4) विणकरी

**7. शेतकरी केव्हा दुबार पेरणी करतात ?**

(1) कमी पाऊस पडल्यावर (2) जास्त पाऊस पडल्यावर

(3) पूर आल्यावर (4) सर्व पर्याय बरोबर

**प्रश्न पुढील कविता वाचून प्रश्न क्र. 8 ते 11 ची उत्तरे लिहा.**

अंग नाही रंग नाही, विचित्र हा वारा
घर नाही दार नाही, नाही कोठे थारा
दांडगा हा जंगलाच्या निबिडात घुसे
फांदी फांदी वाकवून, झोका घेत बसे...
सागराच्या सरितेच्या, लाटावर खेळे
गोंजारीत गवताला, माळावर पळे...
कधी येता क्रोध त्याला, धावे पिशापरी
वनातून, जनातून, मोडतोड करी

**8. दिलेल्या कवितेत कवीने कशाचे वर्णन केले आहे?**

(1) गवत (2) वारा (3) सागर (4) जंगल

**9. कवितेत नदी यासाठी कोणता समानार्थी शब्द वापरण्यात आला आहे?**

(1) सागर (2) नाला (3) सरिता (4) ओहोळ

**10. वाऱ्याला क्रोध आल्यावर वारा काय करतो?**

(1) गवताला गोंजारतो (2) देवदूत होतो (3) झोका घेतो (4) पिशाच्च परी धावतो

**11. दिलेल्या कवितेत वाऱ्याचे घर कोणते आहे?**

(1) जंगल (2) सागर (3) घर (4) कोठेही नाही

**प्रश्न पुढील उतारा वाचून प्रश्न क्र. 12 व 16 ची उत्तरे लिहा.**

साधी राहणी व उदात्त विचारसरणी महात्मा गांधीजी यांनी प्रत्यक्ष अंगीकारली होती. देशातल्या सर्वसामान्य लोकांना अंगभर कपडे नाहीत. हे पाहून गांधीजींनी जन्मभर साधा पंचा वापरायचे ठरवले. ऊन, थंडी, वारा यांची कोणतीही पर्वा न करता जीवनभर हे व्रत पाळले. दररोज होणारी प्रार्थना ही ठरलेल्या वेळीच होत असे. प्रार्थनेमध्ये त्यांचे भजन म्हणजे ''वैष्णव जन तो तेने कहीए जे पीडपराई जाणे रे''। मानवाच्या कल्याणासाठी अहोरात्र झटणे हे कर्तव्य माणूस हा सर्वप्रथम माणूस आहे. माणसाला जाती, धर्म पंथाच्या नावाखाली कमी समजणे हे असंस्कृतपणाचे लक्षण आहे.

**12. पुढीलपैकी सुसंस्कृतपणाचे लक्षण कोणते?**

(1) जातीभेद पाळणे (2) सर्वधर्मसमभाव

(3) स्वतःच्याच विकासाचे व्रत जोपासणे (4) जाती, धर्म, पंथ, उव्व समजणे

**13. गांधीजी पंचा नेसू लागले कारण....**

(1) ते रोज प्रार्थना करीत म्हणून (2) जाती, धर्म, पंथ नष्ट व्हावेत म्हणून

(3) सर्वसामान्य लोकांना अंगभर कपडे नाहीत म्हणून (4) त्यांना पंचा आवडत होता म्हणून

**14. 'वसा' या अर्थाचा कोणता शब्द उताऱ्यात आला आहे?**

(1) विचार (2) कल्याण (3) प्रार्थना (4) व्रत

**15. महात्मा गांधीजींचे आवडते भजन कोणते?**

(1) वैष्णव जन तो तेने कहिऐ । जे पीड पराई जाणे रे (2) राधे कृष्ण राधे कृष्ण कृष्णकृष्ण

(3) जय हरी विठ्ठल जय हरी विठ्ठल (4) राम कृष्ण हरी राम कृष्ण हरी

**16. महात्मा गांधीजींच्या मते मानवाच्या कल्याणासाठी काय केले पाहिजे?**

(1) अहोरात्र झटणे (2) मोलमजुरी करणे (3) मनोरंजन करणे (4) आराम करणे

**प्रश्न पुढील उतारा वाचून प्रश्न क्र. 17 ते 20 ची उत्तरे लिहा**

एक चार वर्षाचा मुलगा शाळेतून घरी आला. तेव्हा त्याच्या खिशात एक चिठ्ठी होती. त्या मुलाला लहानपणापासून कमी ऐकू येत होते. म्हणून त्याची बुद्धी यथातथाच होती. आईने ती चिठ्ठी वाचली. ''आपला मुलगा टॉम इतका मंदबुद्धीचा आहे की त्याला काहीही लिहिता वाचता येत नाही त्याला शाळेतून काढून टाकण्यात यावे.'' आईने उत्तर लिहिले, ''माझा मुलगा टॉम इतक काही मंद बुद्धीचा नाही की त्याला काही शिकता येणार नाही. मी स्वत: त्याला शिकवीन.'' फक्त तीन महिने शाळेत गेलेल्या त्या मुलाला आईने शिकवण्यास सुरुवात केली. त्याच्यावर प्रचंड मेहनत घेतली. दृढनिश्चय, इच्छाशक्ती याच्या जोरावर तो मुलगा खूप मोठा वैज्ञानिक झाला, संशोधक झाला. त्याचे नाव थॉमस अल्वा एडिसन. एडिसनने विद्युत विषयावर फार संशोधन केले आहे. जगावर त्याने केवढे मोठे उपकार करून ठेवले आहेत की ज्याने विद्युत बल्ब (दिवा) याचा शोध लावून आपले जीवन प्रकाशमय केले आहे.

**17. चिठ्ठीतील मजकूर काय होता?**

(1) मुलगा मंदबुद्धीचा (2) मुलगा अतिशय हुशार

(3) अतिशय खट्याळ (4) अतिशय शांत

**18. परिच्छेदात टॉम हे नाव कुणाचे होते?**

(1) मुलाचे (2) मुलीचे (3) थॉमस एडिसन (4) आईचे

**19. मुलाने (टॉमने) कशाचा शोध लावला?**

(1) विद्युत बल्ब (2) रेडिओ (3) विमान (4) बॅटरी

**20. यथातथाच या शब्दाचा अर्थ**

(1) मंदबुद्धी (2) हुशार (3) मेहनती (4) मूर्ख

**21.** **मानसीला शाळेत जायला 1 तास 10 मिनिटे लागतात व शाळेतून परत घरी यायला 70 मिनिटे लागतात तर खालीलपैकी कोणते विधान बरोबर आहे.**

(1) तिला शाळेत जायला जास्त वेळ लागेल. (2) तिला घरी यायला कमी वेळ लागेल

(3) तिला शाळेत व घरी यायला सारखाच वेळ लागेल (4) तिला शाळेतून यायला जास्त वेळ लागेल.

**22.** **सकाळी 7.30 वाजता सुरू होणारी शाळा पावसामुळे 2 तास उशिरा भरली तर शाळा नेमकी किती वाजता भरली.**

(1) 8.30 वाजता (2) 9.00 वाजता (3) 9.30 वाजता (4) 10.00 वाजता


**23.** **एका शाळेत 100 विद्यार्थी आहे. त्यापैकी 1/5 मुली आहेत. तर मुलांची संख्या किती?**

(1) 20 (2) 40 (3) 60 (4) 80

**24.** **4.30 X 399 = ?**

(1) 171570 (2) 181750 (3) 171550 (4) 112750

**25.** **आकृतीचा अरेखांकित भाग किती आहे?**



(1) 60% (2) 90% (3) 25% (4) 75%

**26.** **89295 या संख्येतील 9 या अंकाच्या स्थानिक किंमतीतील फरक किती?**

(1) 0 (2) 8910 (3) 9009 (4) 9090

**27.** **5643215 या संख्येचे विस्तारित रूप खालील पर्यायातून ओळखा?**

(1) 50000+6000+400+30+2 (2) 5000000+600000+40000+3000+200+10+5

(3) 500+600+400+3+20+0+5 (4) 50+61+40+3+200+5

**28.** **10 चॉकलेटच्या समूहाचा 1/2 म्हणजे किती?**

(1) 4 (2) 5 (3) 7 (4) 10

**29.** **45 फुग्यांचा समूहाचा 1/5 म्हणजे किती ?**

(1) 5 (2) 7 (3) 9 (4) 3

**30.** **खालील क्रम मालिकेत पुढचा अपूर्णांक कोणता येईल ते ओळखा?**


$\frac{1}{4}, \frac{2}{8}, \frac{3}{12}, \frac{4}{16}, ?$

(1) $\frac{5}{7}$ (2) $\frac{8}{20}$ (3) $\frac{9}{25}$ (4) $\frac{5}{20}$

31. $\frac{10}{40} = \frac{\square}{8}$ **चौकटीत खालीलपैकी कोणता अंक लिहिल्यास सममूल्य अपूर्णांक तयार होईल?**


(1) 5 (2) 10 (3) 1 (4) 2

32. दिलेल्या आकृतीवरून कोन ओळखा ?



(1) लघुकोन (2) विशालकोन (3) काटकोन (4) सरळकोन

33. दिलेल्या कोनाचे मापन करून योग्य माप ओळखा ?




(1) 30 (2) 50 (3) 90 (4) 60

34. खालील आकृतीबंध पूर्ण करा ?

AA BBC CCCD -------------

(1) DDDE (2) DDDDEF (3) DDDDE (4) DDDEF

35. माझी खेळायची वेळ माझी जेवणाची वेळ यातील फरक ?



(1) 1 तास 3 मिनिटे (2) 1 तास 15 मिनिटे

(3) 1 तास 0 मिनिटे (4) 1 तास 5 मिनिटे


36. गावामध्ये शाळा, मंदिर व दवाखाना एकाच रस्त्यावर आहेत, शाळा व मंदिर **465** मीटर आहे. मंदिर ते दवाखाना **735** मीटर अंतर आहे. तर शाळा ते दवाखाना येथील अंतर किती ?

(1) 1200 मीटर (2) 12000 से. मी. (3) 1.02 कि.मी. (4) 1.2 कि.मी.`

37. एका दुकानातून 4 किलो साखर, 3 किलो साखर तांदुळ 2 1/2 किलो तुरडाळ खरेदी केली असता एकूण सर्व वस्तूंचे ग्रॅममध्ये वजन किती ?

(1) 10000 ग्रॅम (2) 9500 ग्रॅम (3) 8500 ग्रॅम (4) 9000 ग्रॅम

प्र. **38.ते 41 गोदामातील धान्याचा साठा चित्रलेखाद्वारे सोडवा.**



**38.** **तांदळाच्या पोत्याची संख्या गव्हाच्या पोत्यापेक्षा कितीने कमी आहे?**

(1) 3 (2) 24 (3) 8 (4) 5

**39.** **गोदामातील एकूण पोत्यांच्या संख्या किती आहे?**

(1) 22 (2) 21 (3) 176 (4) 168

**40.** **खालीलपैकी योग्य पर्याय निवडा?**

(1) तांदुळ + बाजरी = गहू + ज्वारी (2) तांदुळ + गहु = बाजरी+ज्वारी

(3) तांदुळ + ज्वारी = गहू + बाजरी (4) गहू = तांदुळ + बाजरी

**41.** **एकूण गहूच्या पोत्यांची संख्या किती?**

(1) 8 (2) 40 (3) 64 (4) 48

**42.** **100 रुपये ही रक्कम पुढीलपैकी कोणत्या गटातील नोटा व गाणे घेऊन तयार होईल?**

(1) 10 रुपयाच्या 5 नोटा व 5 रुपयाच्या 10 नोटा

(2) 10 रुपयाच्या 7 नोटा, 5 रुपयाच्या 2 नोटा

(3) 20 रुपयाच्या 4 नोटा, 10 रुपयाची 1 नोट

(4) 50 रुपयाच्या 3 नोटा

**43.** **1000 रु. किलो बदाम घेण्यास 20 रुपयांच्या किती नोटा लागतील?**

(1) 60 नोटा (2) 100 नोटा (3) 10 नोटा (4) 50 नोटा

**प्र. 44 व 45. खालील तक्त्यावरून खालील प्रश्नांची उत्तरे द्या.**

| गोलंदाज | षटके | दिलेल्या धावा | घेतलेले बळी |
|---|---|---|---|
| रवींद्र | ○ ○ ○ ○ ○ | २० | ३ |
| राहूल | ○ ○ ○ | १८ | - |
| रोहित | ○ ○ | १२ | २ |

**44.** **एकूण किती षटके टाकली गेली?**

(1) 18 (2) 12 (3) 10 (4) 20

**45.** **रवींद्रने किती बळी घेतले?**

(1) 2 (2) 3 (3) 0 (4) 5 .